कार्यालयीन परिपत्रक क्र. १२

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
प्रशासन विभाग
दिनांक :- २५/७/२०११

सर्व आगार प्रमुख व सर्व विभाग प्रमुख

यांसकडेस. . . .

**विषय:-** वाहतुक विभाग व कार्यशाळा विभागातील कर्मचाऱ्यांची दिनांक २८/२/२०११ रोजीची अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.

**संदर्भ :-** कार्यालय परिपत्रक क्र.१० दिनांक २८/६/२०११

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते कि, संदर्भांकित कार्यालय परिपत्रकान्वये वाहतुक व कार्यशाळा विभागातील दिनांक २८/२/२०११ रोजी पटावर असणाऱ्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांची मसुदा सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रसिध्द केलेल्या सेवा जेष्ठता यादी बाबत प्राप्त झालेल्या हरकती व आक्षेपांचे सुनावणी घेण्यात आली.सुनावणीस उपस्थिती असलेल्या व अनुउपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या हरकती व आक्षेपांची तसेच दिनांक २४/७/२०११ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकतींची पडताळणी व तपासणी करण्यात येऊन ग्राहय असणाऱ्या हरकती व आक्षेपा प्रमाणे सेवा जेष्ठता यादी मध्ये दुरूस्ती करण्यात आली आहे. वाहतुक व कार्यशाळा विभागातील दुरूस्त करण्यात आलेली अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.सदरची अंतिम सेवा जेष्ठता यादी महामंडळाचे वेब साईटवर टाकण्यात येत आहे.तसेच बिंदू नामावली तपासणीसाठी मा. विभागीय आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विधानभवन, विभागीयआयुक्त कार्यालय, पुणे विभाग,पुणे-१ यांचेकडे अर्ज सादर केलेला आहे.

अंतिम सेवा जेष्ठता यादी आगाराकडील कर्मचाऱ्यांच्या माहितीचे अनुषंगाने आगाराकडील सर्व नोटीस बोर्डरवर योग्य रितीने डकविणेची तसेच कर्मचाऱ्यांना अवलोकनार्थ देणेसंदर्भात कार्यवाही करणेचे करावे.

मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे आदेशा नुसार

अिस. मॅनेजर (एच.आर.) 26/7/2011
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि**